**मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ७१/२०१३ मधील अंतरीम अर्ज क्र.२९११९/२०२५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार रस्त्यावरील खड्डे मुळे होणारे अपघात/मृत्यू यासंदर्भात नुकसान भरपाई देण्यासंदर्भात .**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक :- संकीर्ण- २०२१/प्र.क्र.६३/रस्ते-६**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २० मे, २०२६

वाचा :- शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण- २०२१/प्र.क्र.६३/रस्ते-६, दि.१९.११.२०२५

**शासन परिपत्रक :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल जनहित याचिका क्रमांक ७१/२०१३ मधील अंतरीम अर्ज क्र.२९११९/२०२५ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या दि.१३.१०.२०२५ रोजीच्या आदेशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील खड्डे, मॅनहोल यामुळे होणारे अपघात/मृत्यू यानुषंगाने नुकसान भरपाई देण्यासंदर्भात दि.१९.११.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे :-

| | | |
|---|---|---|
| १ | अपर मुख्य सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | **अध्यक्ष** |
| २ | सचिव (रस्ते) ,सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | **सदस्य सचिव** |
| ३ | संबंधित त्या त्या जिल्ह्याचे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण | **सदस्य** |

२. उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयानुसार सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई हे समितीकडे प्राप्त अपघात प्रकरणांचा प्रकरणनिहाय आढावा घेतील व त्यानुषंगाने न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्वती कार्यवाही पार पाडतील व वेळोवेळी याबाबत समिती अध्यक्ष तथा अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) यांना अवगत करतील. याकामी सचिव (रस्ते) यांना संबंधित ( त्या त्या) कार्यक्षेत्राचे अधीक्षक अभियंता सहाय्य करतील, असे नमूद करण्यात आले आहे.

३. तथापि, माहे एप्रिल २०२६ मध्ये अपघाताच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्यासंदर्भातील प्राप्त तक्रारीनुषंगाने कार्यवाही करताना असे निदर्शनास आले आहे की, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या स्तरावर प्रस्तुत प्रकरणाचा आढावा घेत असताना फिर्यादी, वाहनचालक, कंत्राटदार, रस्ता

तपासणी करणारे संबंधित अभियंता तसेच या प्रकरणातील इतर संबंधित सहभागी यंत्रणा यांचे म्हणणे ऐकून घेण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे सचिव (रस्ते) यांच्या स्तरावर या सर्व बाबींची तपासणी करणे जिकरीचे होत आहे.

४. तरी यानुषंगाने असे आदेशित करण्यात येत आहे की, सर्व विभागातील मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचा शासन निर्णय क्रमांक :- संकीर्ण- २०२१/ प्र.क्र.६३/रस्ते-६, दि.१९ नोव्हेंबर २०२५ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील खड्डे, मॅनहोलमुळे झालेल्या मृत्यू किंवा अपघाताशी संबंधित माहिती मिळाल्यानंतर त्वरीत संबंधित यंत्रणांची बैठक घेवून तसेच या अपघातात सहभागी घटकांबाबत जाणकार व त्या क्षेत्रातील तज्ञ विभागांकडून माहिती एकत्रित करुन सर्वमावेशक अहवाल शासनास शक्यतो ७ दिवसांच्या आत सादर करावा, जेणेकरुन शासनास निर्णयाप्रत पोहचण्यास विलंब होणार नाही. आवश्यकता भासल्यास अपघात घडलेल्या स्थळाच्या जिल्ह्याचे सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचीही मदत घ्यावी. याकामी मुख्य अभियंता , सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग यांना संबंधित ( त्या त्या) कार्यक्षेत्राचे अधीक्षक अभियंता सहाय्य करतील.

५. तसेच या परिपत्रकाद्वारे असेही सुचित करण्यात येते की, मुख्य अभियंता स्तरावर संदर्भीय शासन निर्णयाची अंमलबजावणी आणि पालन यावर लक्ष ठेवण्यासाठी वेळोवेळी (प्रत्येक महिन्यात किमान एकदा व प्रकरणनिहाय आवश्यकतेनुसार वेळोवेळी) बैठक घेऊन तसे शासनास अवगत करावे.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०५२०१५३१२११०१८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHAILENDRA SAHEBRAO BORASE

Digitally signed by SHAILENDRA SAHEBRAO BORASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Works Department, 2.5.4.20=6FC86C9CF78A99B4EB59DF32D1FA7085D30EF3D6BA9BE2D6D9AF10F1268319B8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4B90C6C84296B347D3553DCCEF07A19168E6BD51610DE7F6F3DB47C9CDFAAE5A, cn=SHAILENDRA SAHEBRAO BORASE
Date: 2026.05.20 15:32:24 +05'30'

**( शैलेंद्र बोरसे )**

**उप सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
२. मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५. मा.राज्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

८. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक
९. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक
१०. सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई. यांचे स्वीय सहाय्यक
११. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
१२. (मुंबई/कोकण/पुणे/नागपूर/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नांदेड)
१३. सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ
१४. सर्व सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण
१५. निवडनस्ती (रस्ते-६)